# पुणे विद्यापीठ

संदर्भ : परीक्षा/एम.ए./एम.कॉम./ ३६५ दिनांक : १०.९.२०१२

## परीक्षा फॉर्मविषयी महत्वाची सूचना

सर्व महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, एम.ए. आणि एम.कॉम. ऑक्टोबर,२०१२ मध्ये होणा-या परीक्षेसाठीचे फॉर्म ऑन लाईन ऐन्ट्री पदधतीने भरावयाचा आहे. याची नोटीस आपल्या महाविद्यालयात लावायची आहे. तसेच सदरील भरलेले ऑनलाईन फॉर्मची प्रिंट आऊट व योग्य ती फी विद्यार्थ्यांकडून स्वीकारावी.

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची ऑनलाईन दवारा भरलेल्या फॉर्मची प्रिंटेड कॉपी व योग्य ती परीक्षा फी जमा करुन घ्यावी. तसेच ऑनलाईन वर भरलेला फॉर्म चेक करुल टर्म ग्रॅन्ट झाली की नाही ते चेक करुन फॉर्म जमा करावा. विद्यार्थ्यांनी ऑनलाईनच्या फॉर्मच्या अंतिम दिनांकापर्यंत महाविद्यालयांत जमा करावी कॉलेजने २००८ **Pattern Regular (Semi Patt)** विद्यार्थ्यांचे फॉर्म मॅन्युअली स्विकारु नये. ऑनलाईन प्रिंटेड कॉपी बरोबर लागणारे मार्कशिट व अन्य आवश्यक कागदपत्रे असल्यास विद्यार्थ्यांनी जोडलेली असावी. त्याबरोबर प्रिंटेड कॉपीवर जी परीक्षा फी असेल ती मुलांनी महाविद्यालयांत अंतिम दिनांकापर्यंत भरावयाची आहे. कॉलेजने पूर्वीच्या पदधतीप्रमाणे आवश्यक कागदपत्रे जोडून घ्यावयाची आहेत.

अंतिम दिनांकानंतर विद्यापीठाकडून आपल्या महाविद्यालयाच्या ईमेल आयडीवर *Online Form* भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी पाठविली जाईल त्याची *Print Out* महाविद्यालयांनी काढून घ्यावी.

जमा झालेले सर्व फॉर्म महाविद्यालयांनी फॉर्म *Alfawise* (सिरीयली) लावून सर्व फॉर्मची मिळून एकूण शुल्काचा डी.डी. विद्यापीठाच्या नावाने काढावा. तसेच फक्त एम.ए. परीक्षेसाठी फॉर्म विषयानुसार व *Alfawise* लावून विद्यापीठात जमा करावे. एकूण शुल्काचा डी.डी.तसेच विद्यापीठाकडून अंतिम दिनांकानंतर कॉलेजप्रमाणे मिळालेल्या *Printed Listing* वर दुरुस्त्या करुन विद्यापीठात जमा करण्यात यावा. प्रथमच ऑन लाईनची सुविधा करण्यात आली असून कुठलीही त्रुटी आढळल्यास विद्यापीठाच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती.

### फॉर्म ऑनलाईन विषयीची माहिती पुढीलप्रमाणे.

### College ने विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सूचना.

१) ऑन लाईन फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांजवळ स्वत:चा ई मेल आयडी असणे अत्यावश्यक आहे. नसल्यास विद्यार्थ्यांनी कोणत्याही साईटवर तयार करुन घ्यावा.

**(eg-rediff.Com.Yahoo.Com,gmail.Com)**

२) ऑन लाईन फॉर्म भरण्यासाठी इंटरनेटद्वारे खालील लींकचा वापर करावा.

**Examforms.unipune.ac.in**

३) ऑन लाईन फॉर्म दि. १०/०९/२०१२ पासून वरील वेबसाईट प्रमाणे भरावयाचा आहे.

४) वरील लिंकवर विद्यार्थ्यास स्वत:चा *login ID* तयार करता येईल. तो व त्याचा पासवर्ड विद्यार्थ्यास त्याने नमूद केलेल्या ईमेल आयडीवर पाठवण्यात येईल.

५) फॉर्मवरील *निर्देशित केलेले *Fields Compulsory* (आनिवार्य) भरावे लागणार आहे.

६) विद्यार्थ्यांनी **Online** भरलेल्या फॉर्मची *Printout* पूर्वीचे **Mark Statement** ची *Xerox Copy* व आवश्यक असल्यास अन्य कागदपत्रे व प्रिंटेड वर निर्देशित केलेली फीची रक्कम कॉलेजमध्ये अंतिम दिनांकापर्यंत जमा करावी.

७) विद्यार्थ्याचा अर्ज जोपर्यंत मा. प्राचार्यांची सही घेऊन व त्याच्या फीची रक्कम महाविद्यालयामार्फत वित्त विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा होत नाही तोपर्यंत ग्राहय धरला जाणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अंतिम दिनांकापर्यंत प्रिंटेड फॉर्म व फी कॉलेजमध्ये जमा करावी.

८) विद्यार्थ्यांनी *Online* फॉर्म भरताना *Optional Subject* काळजीपूर्वक तपासून विषय सिलेक्ट करावा.

९) विषय बदलाबाबत कॉलेजशी संपर्क साधावा. आपला *PRN* काळजीपूर्वक टाकून तसेच आलेले नाव **Confirm** करावे. अन्यथा कॉलेजमार्फत विद्यापीठास कळवावे.

१०) *Online Form* भरताना *Submit Form*केल्यावर जर *Submit* होत नसेल तर भरलेला पूर्ण फॉर्म तपासून कुठल्या फिल्डला लाल अक्षरात मेसेज आला असेल तर त्या फिल्डची माहिती व्यवस्थित भरावी मग *Submit* करावे.

<u>कॉलेजसाठी सूचना -</u>

१) *Online Form* फक्त *Semester Pattern* रेग्युलर विद्यार्थ्यांसाठी आहेत. सर्व *C.I.S.* विद्यार्थ्यांनी फॉर्म पूर्वीच्या पद्धतीने पाठवावे.

२) महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रिंटेड फॉर्म विद्यार्थ्यांकडून जमा झाल्यावर *Alfawise* लावून विद्यापीठात जमा करावे. फक्त एम.ए. परीक्षेसाठीचे फॉर्म विषयानुसार *Alfawise* लावून विद्यापीठास अंतिम दिनांकापर्यंत जमा करावे.

३) परीक्षा अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेनंतर महाविद्यालयनिहाय डाटाची प्रत महाविद्यालयांना *mail*/प्रत्यक्ष/किंवा नगर/नाशिक सेंटर येथे उपलब्ध करुन देण्यात येतील. ही प्रत प्रत्यक्ष अर्जावरुन तपासून फक्त ज्या विद्यार्थ्यांची फी जमा झाली आहे त्यांचेच अर्ज विद्यापीठात एकत्रित फी च्या डी. डी. सहीत अंतिम दिनांकापर्यंत जमा करावेत.

४) महाविद्यालयानी त्यांना वरील प्रकारे मिळालेली डाटाची प्रत प्रत्यक्ष अर्जावरुन तपासून ज्या विद्यार्थ्यांची फी जमा झालेली आहे असेच अर्ज विद्यापीठाच्या फी सहित व विद्यार्थ्यांच्या अर्जावर मा. प्राचार्यांची सही घेऊन विद्यापीठात जमा करावयाचे आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्याने फी भरलेली नाही त्याच्या नावापुढे **delete असे लाल अक्षरात लिहावे ही करेक्शन** विद्यापीठातून प्राप्त झालेल्या डेटाच्या प्रतींवर (*Hard Copy* वर) करणे आवश्यक आहे. तसेच नावात किंवा विषयात बदल करावयाचा असेल तर तो सुदधा याच डाटाच्या प्रतीवर मूळ डेटावर गोल करुन त्याच्या खाली योग्य बदल करावा. नंतर नाव किंवा विषय इ. चे बदल स्वीकारले जाणार नाहीत.

५) *Fresh* बसणा-या विद्यार्थ्यांची *Term grant* झाली की नाही ही तपासणी *College* ने करुन त्याचा फॉर्म पुणे विद्यापीठास पाठवावा.

६) ज्या विद्यार्थ्यांनी टर्म ठेवली आणि *PRN*नसलेले (*Fresh*) विद्यार्थ्यांचे फॉर्म नंबर वेगळे कळवावे.

७) ज्या विद्यार्थ्यांना टर्म ठेवून पुढच्या सेमिस्टरचे फॉर्म भरावयाचे असतील त्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून जुन्या पदधतीने फॉर्म भरावा.

८) एम.ए. व एम.कॉम. २००८ सेमिस्टर पॅटर्नच्या *Online form* विद्यार्थ्यांसाठी दि. १०/०९/२०१२ ते २०/०९/२०१२ विनाविलंब शुल्क पदधतीने फॉर्मची मुदत राहील. तसेच २१/०९/२०१२ ते ३०/०९/२०१२ पर्यंत विलंब शुल्कासह फॉर्म जमा करण्याची मुदत राहील. महाविद्यालयांनी विद्यापीठाकडून *Hard Copy* मिळाल्यानंतर ८ दिवसांत दुरुस्ती सहीत चलन व *Physical form* दुरुस्तीसहीत यादी जमा करावी.

९) विनाविलंब व विलंब शुल्काच्या मुदतीनंतर वेगवेगळे चलन जनरेट करुन त्याप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेत पैसे भरुन त्या चलनाची कॉपी फॉर्मसोबत विद्यापीठात जमा करावी.

१०/९/१२

मा. परीक्षा नियंत्रक.
पुणे विद्यापीठ, पुणे ७.

*URG/Exam-inf./१-२-३*